
प्र. सं. वाचनालय, ठाणे
विषय बा० वा०
क्र. ३९६०



IRBK-0103170

# महर्षि अण्णा कर्वे

3950 281

# महर्षि
# अण्णा कर्वे

गणेश ग्रंथ संग्रहालय, ठाणे. 28880 अनुक्रम विभाग मा. वा. क्रमांक 9052 नोंदणी क्रमांक 3917314 वाचनालय ठाणे.

लेखक
**भा. आ. वीरकर**, बी. ए., बी. टी.
अध्यापक, नाथीबाई दामोदर ठाकरसी कन्याशाळा, मुंबई

म. ग्रं. सं. ठाणे. वाचनालय ठाणे.
मु. क्र. 3950 नोंद
वि. मा. वा.

IRBK-0103170
IRBK-0103170

केशव भिकाजी ढवळे, श्रीसमर्थ–सदन, मुंबई ४

मूल्य आठ आणे

सर्वाधिकार
सुरक्षित
प्रथमावृत्ति
१८ एप्रिल १९४८

चित्रें : कल्पना
ठसे : मुद्रा
१०३, शींव
मुंबई २२

मुद्रक
बा. ग. ढवळे
कर्नाटक
मुद्रणालय
१०३, शींव
मुंबई २२

प्रकाशक
के. भि. ढवळे
श्रीसमर्थ-सदन
गिरगांव,
मुंबई ४

# पुरस्कार

महर्षि धोंडो केशव कर्वे ह्यांना येत्या एप्रिल १८ ला ९० वर्षें पुरीं होऊन ९१ वें वर्ष लागेल. मुंबापुरी त्यांचा त्या निमित्तानें सत्कार करणार आहे. अत्यंत आनंदाचा नि धन्यतेचा हा दिवस आहे. महर्षींसारखीं अखंड कर्मयोगी माणसें आपणांमध्यें आज नव्वद वर्षें जगलीं ही लहानसहान गोष्ट नाहीं. देवाची ती परम कृपा समजावी. ह्या देशांतील किती तरी थोर माणसें—विष्णुशास्त्री, आगरकर, गोखले, विवेकानंद, रामतीर्थ—अल्पवयी झालीं. देशांतील सरासरी आयुर्मानच पंचविसाच्या आंतलें. म्हणून अण्णासाहेबांसारखीं थोर माणसें अजून नव्वद वर्षें होत आलीं तरीही कार्य आहेत हें पाहून एक प्रकारची कृतज्ञतेची भावना मनांत येते.

महर्षींचें आत्मवृत्त १९१५ डिसेंबरमध्यें प्रथम प्रसिद्ध झालें. त्या वेळीं मुंबईला भरलेल्या सामाजिक परिषदेचें अध्यक्षस्थान त्यांना देण्यांत आलें होतें. त्याच वेळीं मनोरंजन मासिकाचे संपादक श्री. काशीनाथ रघुनाथ मित्र ह्यांनीं अण्णांचें आत्मवृत्त प्रसिद्धिलें, त्याला श्री. रघुनाथराव परांजपे ह्यांनीं मार्मिक नि सहृदय प्रस्तावना लिहिली होती. तींत ते म्हणतात, "अण्णांनीं लिहिलेलें हें आत्मवृत्त म्हणजे परमेश्वरापुढें दिलेली जबानी होय." महर्षींनीं लिहिलेलें तें आत्मवृत्त अपूर्व आहे. मी मॅट्रिकच्या वर्गांत असतांना म्हणजे १९१७ मध्यें तें आत्मवृत्त वाचलें. तें पुस्तक वाचून माझ्यावर नि माझ्या मित्रावर अपार परिणाम झाला होता. अण्णांचें नांव मीं लहानपणापासून ऐकलेलें. माझ्या आईच्या चुलत्यांनींही पुनर्विवाह केलेला. ते अण्णांचे स्नेही होते. माझी मावशी १९०७ मध्यें हिंगण्यालाच शिकायला राहिली. लहानपणापासून महर्षींना मी मनांत भक्तिभावानें पूजीत आलों आहें.

महर्षींचें कार्य थोर आहे. तीन मुलींचा आश्रम त्यांनीं प्रथम सुरू केला. त्या लहान संस्थेंतून आज केवढा विस्तार झाला आहे. महिला विद्यापीठ आज उभें आहे. स्त्रियांसाठीं स्वतंत्र विद्यापीठ भारतांत अन्यत्र नाहीं. ह्या विद्यापीठाच्या शाखा अनेक प्रान्तांतून आहेत. तें जणूं अखिल भारतीय आहे. अण्णांनीं सारें जीवन स्त्रीशिक्षणाच्या पुरस्कारांत, स्त्रियांचा सर्व बाजूंनीं विकास व्हावा, त्यांना समाजांत मानाचें स्थान मिळावें, त्यांच्या सुखदुःखांची, भावनांची समाजाला जाणीव यावी,

ह्यासाठीं पराकाष्ठेचे प्रयत्न करण्यांत समर्पिलें. त्यांना आज एक प्रकारें कृतकृत्य वाटत असेल. निंदा, अपमान, अडचणी सारें सहन करून ज्या ध्येयाची त्यांनीं अविरत कर्मपूजा केली, तें ध्येय समाजानें आज आपलेंसें केलें आहे असें पाहून अण्णांना कां बरें आनंद होणार नाहीं ? आणि त्यांच्या त्या आनंदांत सारा महाराष्ट्र, सारा देश कां बरें सहभागी होणार नाहीं ?

महर्षि अखंड कर्मयोगी आहेत. हेतुमय त्यांचें जीवन आहे, ध्येयमय जीवन आहे. क्षणही ते व्यर्थ दवडीत नाहींत. आज आतां नव्वद वर्षें होत आलीं तरी समतासंघासारख्या संस्था काढीतच आहेत. समतासंघाचें लहानसें वृत्तपत्रही त्यांनीं सुरू केलें आहे. ते शक्तीचा कणन् कण सांभाळून वापरतात. ते सावकाश बोलतील. सारें शांतिमय काम. आदळआपट नाहीं. त्यांची कर्मज्वाला सारखी प्रज्वलित आहे. प्रभु त्यांना शतायु करो.

अण्णा स्त्रियांच्या उद्धारासाठीं सतत झिजत आले. त्यांची दृष्टि स्त्रियांनीं केवळ शिकावें अशी नव्हती. संसार सांभाळून राष्ट्राच्या संसारांतही त्यांनीं लक्ष द्यावें असें त्यांना वाटे. १९३० च्या एप्रिलमधील गोष्ट. अण्णा जगाची यात्रा करून परत आले होते. ते बोटींतून आपल्या जन्मग्रामीं जात होते. मी त्याच बोटींत होतों. अण्णा म्हणाले, "मुंबईच्या सत्याग्रहांत स्त्रियांनीं भाग घेतलेला पाहून, त्यांच्या त्या मिरवणुकी पाहून, पोलीस सभोवतीं आहेत तरी निर्भयपणें त्या जात आहेत असं पाहून माझ्या डोळ्यांचं पारणं फिटलं. विलेपार्लें येथील सत्याग्रहीशिबिर पाहून मलाही स्वयंसेवक म्हणून नांव नोंदवावं असं वाटलं." भारतीय मायबहिणी राष्ट्राच्या स्वातंत्र्ययुद्धांत भाग घेत आहेत हें पाहून अण्णांच्या डोळ्यांचें पारणें फिटलें. स्त्रियांबद्दलच्या त्यांच्या काय अपेक्षा होत्या तें ह्या दोन शब्दांत आहे.

ह्या राष्ट्रीय दृष्टीबरोबरच त्यांच्याजवळ एक अति राष्ट्रीय म्हणजे मानवतेची दृष्टि आहे. त्यांनींच एके ठिकाणीं म्हटलें आहे, "प्रार्थना करतांना आपले प्रतिस्पर्धी, वैरी ह्यांचेंही भलें चिंतावें. त्यामुळें मनांतील द्वेष कमी होतो, संताप कमी होतो. आपण समतोल होतों. सर्वांविषयीं प्रेम वाटायला ह्या साधनाचा उपयोग करावा." अशा अर्थाचे ते शब्द आहेत. मला त्या शब्दांचा अपार उपयोग झाला आहे. अण्णांजवळ जातिभेद, धर्मभेद, प्रान्तभेद, राष्ट्रभेद नाहींत. जागतिक

समतासंग्राचें कार्य ते आपल्याकडे करीत आहेत. मानवजातीचे ते उपासक आहेत. सर्वांनीं सर्वांना सन्मानावें, कोणाला दुःख देऊं नये, हिडोसफिडीस करूं नये अशा थोर संतवृत्तीचे अण्णा आहेत.

महर्षींविषयीं मला अपार भक्तिप्रेम वाटतें. माझ्या हरिजनदौऱ्याच्या वेळेस आमच्या समितीचे तेच अध्यक्ष होते, त्यांनीं आशीर्वाद दिला होता. १९३६ मध्यें "श्यामची आई" हें माझें पुस्तक वाचून पुण्याला माझ्या खोलीवर मुद्दाम भेटायला आले होते. मी परगांवीं गेलों होतों. मी पुढें त्यांना भेटायला गेलों. त्यांनीं पाठीवरून हात फिरविला. अण्णांविषयीं मी किती लिहूं? उतारवयांतही पुणें शहरांत सकाळीं ते घरोघर जायचे, साक्षरता प्रसारासाठीं मिळेल ती मदत मिळवायचे. रोजचें फिरणेंही होई, कामही होई. महात्माजी "हरिजनके वास्ते" असें म्हणून हात पुढें करीत तेव्हां हृदय उचंबळे. महर्षि साक्षरता प्रसारासाठीं हात पुढें करीत. अशांच्या रूपानें प्रभुच जणूं समोर उभा असतो असें एका इटॅलियन कवीनें म्हटलें आहे तें सार्थ वाटतें.

श्री. भा. आ. वीरकर ह्यांनीं महर्षींचें हें लहानसें परंतु गोड चरित्र ९० वर्षें पुरीं होत आहेत अशा शुभ प्रसंगीं प्रसिद्ध व्हावें म्हणून लिहिलें आहे. श्री. वीरकर ध्येयवादी शिक्षक आहेत. ते मला म्हणाले, "तुम्ही दोन शब्द पुरस्काराचे लिहा." मी नाहीं म्हणूं शकलों नाहीं. कारण महर्षि अण्णा कर्वे ह्यांच्याविषयीं मला जें वाटतें तें शब्दातीत आहे. श्री. वीरकरांनीं लिहिलेलें चरित्र मीं वाचलें. मला तें आवडलें. अण्णांची ध्येयार्थी, अखंड यत्नशीळ, अखंड वर्धमान अशी मूर्ति ह्या पुस्तकानें डोळ्यांसमोर उभी राहाते. त्यांच्या पुस्तकाला हे दोन शब्द लिहून महर्षींच्या सत्कारांत मीही नम्रपणें भाग घेत आहें. महर्षि शतायु होवोत. त्यांचें महान् जीवन सदैव प्रेरणा देवो. श्री. वीरकरांनीं लिहिलेल्या सुंदर चरित्राचें पुन्हा एकदा अभिनंदन करून महर्षींना भक्तिमय प्रणाम मनांत करून मी हा पुरस्कारलेख संपवितों.

पां. स. साने

मुंबई, १७-३-४८

★

# हकीकत

महाराष्ट्रांतच नव्हे तर सर्व हिंदुस्थानभर डॉ. अण्णासाहेब कर्वे ह्यांच्या जीवित-कार्याबद्दल कल्पनातीत आदरबुद्धि आहे. त्यांच्या ९० व्या वाढदिवसाच्या निमित्तानें त्यांच्या लोकोत्तर चरित्राचें धावतें दर्शन करून देणारें हें छोटेंसें पुस्तक वाचकांच्या हातीं द्यायला मला अतिशय आनंद होत आहे.

अण्णांच्या पावलावर पावलें टाकून महिलांच्या शिक्षणासाठीं रात्रंदिन तन्मयतेनें झटणारे त्यांचे एक सहकारी प्रा. वा. गो. मायदेव ह्यांच्या प्रेरणेमुळेंच ही अल्पस्वल्प सेवा सादर करायला मला उत्तेजन मिळालें. त्याचप्रमाणें 'कर्तव्य' सायंदैनिकाच्या कामांत चूर असतांही, प्रेमळ बंधु श्री. साने गुरुजी ह्यांनीं हस्तलिखित वाचण्याचे श्रम घेऊन आपला 'पुरस्कार' लिहून देऊन मला उपकृत केलें आहे.

जिज्ञासू वाचकांना अण्णांचें मोठें आत्मचरित्र, संक्षिप्त आत्मचरित्र व Looking Back हीं पुतकें सविस्तर माहिती मिळविण्याच्या दृष्टीनें खास उपयोगी पडतील. परंतु त्यांचा जीवनवृत्तान्त थोडक्यांत निवेदन करण्याचा हा अल्प प्रयत्न आहे. तो कितपत साधला आहे हें पाहाण्याची वाचकांना विनंती करून हे दोन शब्द पुरे करतों.

भा. आ. वीरकर

बालपण
कॉलेजांत
एम्. ए. साठीं धडपड
समाजसुधारणेचा श्रीगणेशा
हिंगणें कीं पुणें ?
समाजसेवकांचा ' निष्काम कर्ममठ '
कौटुंबिक जीवन
भारतवर्षीय महिला विद्यापीठ
महात्माजींचा आशीर्वाद
पहिलीं कठीण वर्षें
दानशूर सर विठ्ठलदास ठाकरसी
श्रीमती ना. दा. ठा. भारतवर्षीय महिला विद्यापीठ
युरोपची यात्रा व जागतिक शिक्षण परिषद
ठाकरसींची ग्रँट बंद
अण्णांचीं नवीं ध्येयें

★

# महर्षि अण्णा कर्वे

आपल्या ह्या भाग्यवान् देशामध्यें अलीकडच्या काळांत जीं कांहीं प्रातःस्मरणीय ऋषितुल्य अशीं माणसें झालीं आहेत त्यांत गुरुवर्य अण्णा कर्वे ह्यांचें नांव नित्य घेतलें पाहिजे. हें सुमंगल नांव उच्चारतांच घरोघरीं आपल्या मातांच्या आणि भगिनींच्या हृदयांत अत्यंत आदरयुक्त भावना जागृत होतात, नाहीं का? भारताच्या ह्या विनम्र सेवकाच्या निरलस आणि ध्येयवादी जीवनाची बहुमोल जोड अगदीं आमच्या राष्ट्रीय पुनरुत्थानाच्या काळांतच आपणांला लाभल्यामुळें व एक प्रकारें आपलें अंगीकृत कार्य अविरत निश्चयानें अत्यंत यशस्वी करायला त्यांना उत्तम आरोग्य व उदंड आयुष्य लाधल्यामुळें त्यांच्याबरोबर भारतालाही आज त्यांच्या ९० व्या वाढदिवसाच्या समयीं धन्यता वाटत असेल! महाराष्ट्र आणि गुजराथ ह्या शेजारच्या दोन प्रांतांत अण्णांनीं स्थापन केलेल्या श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी विद्यापीठाच्या कार्याचा विशेष विस्तार झाला असला तरी 'ध्येय उंच असावें' ह्या दृष्टीनें स्थापनेच्या वेळींच विद्यापीठाचें स्वरूप प्रादेशिक न ठरवितां, अखिल भारतीय असें ठेवण्यांत आलें हें लक्षांत ठेवण्याजोगें आहे. हिंदुस्थानांतील कोणतीही स्त्री असो, ती कोठेंही राहात असो, तिची मातृभाषा कोणतीही असो, तिला जर स्वभाषेची हेळसांड न करतां, उच्च शिक्षणमार्गाचा दरवाजा खुला हवा असेल, तर तिनें ह्या विद्यापीठाकडे धाव घ्यावी; तेथें प्रांतीयता, जातिभेद, धर्मभेद किंवा संकुचित भाषाभिमान तिला मज्जाव करणार नाहीं. सबंध भारतीय संस्कृतीची जी उदार सर्वसंग्राहक दृष्टि, तीच विशाल दृष्टि ह्या

विद्यापीठाच्या निर्मात्यांनीं आरंभापासून ठेविली आहे. ह्याच्या पाठीमागें अण्णा कर्वे ह्यांचा अखिल स्त्रियांविषयींचा अपार जिव्हाळा व तज्जन्य कळकळ ह्याच भावनांचें सुमधुर दर्शन आपणांला होईल.

## बालपण

मुंबईपासून सुमारें नव्वद मैलांवर असलेल्या कोंकणांतील मुरुडनजीक शेरवली ह्या गांवीं अण्णांचा जन्म झाला. ता. १८ एप्रिल, १८५८ हा अण्णांचा जन्मदिन. अण्णांच्या मुरुड गांवीं त्या वेळीं वेदविद्येला अतिशय प्रतिष्ठा होती. ऋग्वेद व यजुर्वेद अशा दोन्ही शाखांच्या पढीक विद्वानांचें तेथें पठण चाले. दशग्रंथी ब्राह्मणांचा सन्मान करण्यांत ग्रामस्थांना मोठें भूषण वाटे. कालमानानें इंग्रजी अमदानींत सुद्धा तेथें शिक्षणाची सोय फार लौकर म्हणजे इ. स. १८३४ सालींच झाली होती.

अण्णांचीं तीन मोठीं भावंडें लहानपणींच निवर्तलीं होतीं. साहजिक त्यांच्यापेक्षां वडील अशा त्यांच्या भावाचें जास्त कौतुक आईवडिलांनीं केलें व शिक्षणाची आबाळ झाली.

अण्णांचें बालपण गरिबींत गेलें. परंतु त्यांच्या वडिलांनीं कधीं एक पैचेंही कर्ज केलें नाहीं व त्यांच्या मातुःश्रींनीं अत्यंत सुखासमाधानानें गरिबीचा संसारही नीटनेटका केला. 'पहांटेपासून रात्रीं अकरापर्यंत निमुटपणें राबणारी ती कष्टाळू मूर्ति' मुलाबाळांचें करण्यांत व आपल्या अंध सासूची सेवाशुश्रूषा आस्थेनें उरकण्यांत कृतकृत्य होत असे. ह्या संस्काराचे परिणाम अण्णांच्या बालहृदयावर किती खोलवर उमटले ह्याची साक्ष त्यांचा जीवितग्रंथच देत आहे.

अण्णांचें प्राथमिक शिक्षण मुरुडला झालें व पुढें ते मुंबईला आले. ते इंग्रजी पांचवीमध्यें असतांनाच त्यांचे वडील वारले. अण्णांसंबंधीं त्यांना फार उमेद वाटे, परंतु त्यांच्या आशा सफल होण्यापूर्वींच मुलांचें छत्र गेलें. अण्णांचे वडील भाऊ प्राथमिक शाळेंत शिक्षक होते; परंतु अण्णांना इंग्रजी शिकवावें अशी त्यांना उत्कट इच्छा असे व स्वतःच्या पोटाला चिमटा घेऊनही ते आपल्या भावाला आपल्याकडून होईल ती पैशाची मदत करायला चुकत नसत.

त्या वेळची मॅट्रिकची परीक्षा म्हणजे सरकारी नोकरींत प्रवेश मिळण्याचें सुलभ द्वार होतें. अण्णांचा अभ्यास चांगला होता व आईच्या आणि प्रेमळ बंधूंच्या प्रोत्साहनानें त्यांनीं शिकवण्या करून सुद्धा यश गांठण्याची हिंमत बाळगली. मॅट्रिकपर्यंत पहिल्या तर कधीं दुसऱ्या नंबरची शिष्यवृत्ति पटकावल्याशिवाय अण्णांनीं सोडली नाहीं. त्या वेळची अण्णांची एक आठवण सांगण्यासारखी आहे. एकदा त्यांच्या एका वर्गबंधूनें त्याच्या बहिणीला अण्णा शिकवायला तयार आहेत का, म्हणून विचारलें. अण्णांनीं कांहींच ठराव न करतां ताबडतोब संमति दिली. महिना संपतांच त्या मित्रानें त्यांच्या हातावर अवघा एक रुपया ठेवला. अण्णा निरुत्तर झाले ! त्यांच्या मेहनतीच्या मानानें त्या काळीं देखील तें वेतन किती क्षुद्र होतें ! पण अण्णांच्या स्वतःच्या कमाईचा तो पहिला रुपया ! तो न झिडकारतां, त्यांनीं त्याचा साभार स्वीकार केला आणि नंतर ती शिकवणी सोडून दिली. मॅट्रिकच्या वर्गांत असतांनाची गोष्ट. १८[illegible] जानेवारींत शिरगणती व्हायची होती. बारा दिवस तें काम चालायचें होतें व दिवशीं रुपया ह्याप्रमाणें वेतन मिळणार होतें. अण्णांना



विभाग
क्रमांक
नों. दि. 3913

त्यासाठीं बारा दिवस शाळा बुडवावी लागणार ह्याचें वाईट वाटलें; पण ही दुर्मिळ संधि दवडूनही चालण्यासारखें नव्हतें. परीक्षा जवळ आलेली. परंतु एका ज्यू वर्गमित्राच्या मदतीनें त्यांनीं हें काम मिळविलें व अखेर परीक्षेंतही चांगल्या प्रकारें उत्तीर्ण झाले.

## कॉलेजांत

त्या काळच्या रिवाजाप्रमाणें अण्णांचा बालविवाह झालेला होता. त्यांच्या पत्नी राधाबाई, ते मॅट्रिक पास झाले त्याच सुमारास प्रसूत होऊन त्यांना मुलगा झाला. हेच आपणांला परिचित असे सुविख्यात समाजशास्त्रज्ञ प्रा. रघुनाथराव कर्वे होत. अण्णांना पुढें अभ्यास चालू ठेवण्याची आशा नव्हती. नवीन जबाबदाऱ्या पाठीवर व घरची स्थिति यथातथा. अशा प्रसंगीं पदवीधर होण्याची महत्त्वाकांक्षा बाळगणें वेडेपणाचें ठरलें असतें. परंतु परीक्षेचा निकाल लागून अण्णांचे परम स्नेही नरहरपंत जोशी ह्यांच्या सक्रिय उत्तेजनामुळें त्यांना कॉलेजांत जायला सापडलें. सर्व विद्यार्थ्यांत अण्णांचा नंबर १६ वा आला आणि जोशी तिसरे आले होते. उभयतांनीं विल्सन कॉलेजमध्यें नांव दाखल केलें. अण्णांना दरमहा शिष्यवृत्तीही मिळाली व त्यांच्या बुद्धिमान् मित्राच्या सतत सान्निध्यांत त्यांना विशेष उत्साह व हुरूप वाटूं लागला.

विद्यार्थीदशेंत जोडलेला जिव्हाळ्याचा स्नेह हा खरोखर अण्णांच्या आयुष्यांतील एक बहुमोल ठेवा म्हटला पाहिजे. दोघांनीं एकत्र मिळून किती पुस्तकें वाचावीं, तऱ्हेतऱ्हेच्या विषयांवर चर्चा करावी, स्पेन्सरसारख्या पाश्चात्य ग्रंथकारांचें तत्त्वज्ञान समजून घ्यावें व समाजसुधारणेच्या विषयांचा खल करावा, हा उभयतांचा नित्यक्रम चालू असे.

पुढें अण्णा एल्फिन्स्टन कॉलेजांत गेले. फर्स्ट इयरमध्यें गणित व विज्ञान ह्या विषयांत अण्णांना पारितोषिक मिळालें होतें. साहजिक त्यांनीं बी. ए. ला गणित विषय घेतला व त्यांत प्रावीण्य मिळवून विद्यापीठाच्या त्या विषयाच्या मुलांत त्यांनीं पहिला नंबर पटकावला ( १८८४ ). घरप्रपंचाची विवंचना होतीच. म्हणून एम्. ए. ला जाण्याचा विचार असूनही आधीं नोकरी शोधणें जरूर होतें. विद्याव्यासंगी अण्णांनीं आपल्या स्वभावाला जुळेसा शिक्षकाचा पेशा स्वीकारला. एल्फिन्स्टन कॉलेजांतील एका प्राध्यापकांनीं त्यांची शिफारस केली व कांहीं दिवस एल्फिन्स्टन हायस्कूलमध्यें हंगामी शिक्षकाचें काम करून अण्णांनीं अध्यापनाचा पहिला अनुभव संपादन केला.

## एम्. ए. साठीं धडपड

सरकारी कायम शिक्षकाची नोकरी पत्करण्यापेक्षां प्रथम एम्. ए. होऊन घ्यावें असें अण्णांना फार वाटत होतें. ह्या वेळीं त्यांनीं पदार्थविज्ञान व रसायनशास्त्र हे ऐच्छिक विषय निवडले. परंतु केवळ शिकवण्या करून पोट भरण्याची तारांबळ होत असल्यामुळें त्यांना निवान्तपणें ह्या विषयांकडे हवें तसें लक्ष देतां आलें नाहीं. आजकालच्या वाहनांच्या सोयीही तेव्हां उपलब्ध नव्हत्या. ना ट्रॅम ना बस. पायींच रखडपट्टी करीत अण्णांना 'गृहस्थाश्रम' चालविण्यासाठीं दूरदूरच्या शिकवण्या करीत वणवण करावें लागे. ह्याचा परिणाम व्हायचा तोच झाला. अण्णा नापास झाले. परंतु पदवी पदरांत न पडली तरी जें कांहीं त्यांनीं वाचलें होतें त्याचा त्यांना अगदींच उपयोग झाला नाहीं असें नाहीं. पुण्याला

गेल्यावर फर्ग्युसनमध्यें इंटरला 'फिजिक्स' शिकविण्याची त्यांना संधि आली व त्या वेळीं मिळविलेली विद्या त्यांच्या चांगलीच उपयोगी पडली.

## समाजसुधारणेचा श्रीगणेशा

पुनर्विवाहाचें कार्य हें एक सत्कार्य आहे असें अण्णांच्या मनानें घेतलें होतें. ह्याला कारण ते मुरुडला असतांनाच घडलें. त्यांचे जिवलग मित्र नरहरपंत जोशी त्यांच्या गांवीं जात व अण्णाही नरहरपंतांच्या देवरूख गांवीं अनेक वेळां गेलेले असल्यामुळें उभय कुटुंबांचा घरोवा वाढला होता. अण्णा बी. ए. झाल्यानंतर त्यांचें प्रथम कुटुंब निवर्तलेलें; तेव्हां पुन्हा लग्न करावें किंवा नाहीं हा एक चर्चेचा विषय झाला. नरहरपंतांची एक बहीण गोदूताई ( आनंदीबाई ) ह्या बालविधवा असून पंडिता रमाबाई ह्यांच्या शारदा-सदन संस्थेंत त्यांना त्यांच्या बंधूंनीं शिकण्यासाठीं ठेवलें होतें. त्यांचे वडीलही प्रागतिक मताचे असल्यामुळें त्यांनीं अण्णांना पुनर्विवाहाविषयीं विचारलें.

अण्णा म्हणाले, "एखादी ब्राह्मण बालविधवा माझ्याबरोबर गरिबीचा संसार करायला तयार असेल तरच मला पुन: लग्न कर्तव्य आहे. नाहीं तर मी विधुरावस्थेंतच दिवस कंठण्याचें ठरवलं आहे." "मग आमच्या 'बायाशीं' ( आनंदीबाई ) लग्न करतां का?" ह्या प्रश्नालाही अण्णांनीं नि:संदिग्ध उत्तर दिलें. "त्यांची जर संमति असेल तर माझी ना नाहीं."

आनंदीबाईच्या वडिलांच्या थोर अंत:करणाची प्रचीति येऊन हा अपूर्व पुनर्विवाह अशा तऱ्हेनें विनासायास घडून आला. 'आधीं केलें, मग सांगितलें' ह्या उक्तीप्रमाणें अण्णांनीं विधवा-विवाहाच्या प्रसारार्थ

मोठ्या हुरूपानें कार्याला सुरुवात केली. मानखंडना, समाजनिंदा व आप्तस्वकीयांचा रोष ह्यांची तमा न धरतां, अण्णांनीं ठरविल्याप्रमाणें एका सत्कार्याला मनोभावें वाहून घेतलें.

वैधव्य प्राप्त होणें ह्याहून अधिक दु:खदायक प्रसंग स्त्रियांच्या आयुष्यांत क्वचितच असेल. प्रथम पत्नीच्या निधनानंतर विधवांच्या हालअपेष्टांचीं हृदयविदारक चित्रें अण्णांना विव्हल करीत आणि पुनर्लग्नाविषयीं विचार मनांत येत तेव्हां जनरूढीला बळी न पडतां स्वत:ला 'पवित्र वाटणाऱ्या व कांहीं थोर विभूतींनीं घालून दिलेल्या' मार्गानेंच जायचें असा दृढनिश्चय त्यांनीं केला. आतां समाजांत विधवाविवाह होत असले तरी अजूनही त्याबाबत 'यद्यपिशुद्धं लोकविरुद्धं नाकरणीयं नाचरणीयं' अशीच सामान्यत: स्थिति आहे. तेव्हां ५०।६० वर्षांपूर्वी हा मार्ग अनुसरण्यांत अण्णांनीं केवढें नैतिक धैर्य दाखविलें ह्याची कल्पनाही करवत नाहीं !

'माझ्या हातून हिंदी स्त्रीसमाजाची जी अल्प सेवा घडत आहे, तिचें मूळ कारण पुनर्विवाहाच्या कामांत मीं पुढें पाऊल टाकलें हें होय' असें अण्णांनीं आत्मवृत्तांत लिहिलें आहे. खरोखर 'अनाथ बालिकाश्रमाची' स्थापना करण्याची प्रेरणा अण्णांना ह्या कार्यांतूनच मिळाली. महाराष्ट्रांत विधवांच्या शिक्षणाचा प्रश्न अत्यंत कळवळ्यानें पंडिता रमाबाई ह्यांनीं प्रथम हातीं घेतला. परंतु सर रामकृष्ण भांडारकर, न्यायमूर्ति रानडे प्रभृति मान्यवंतांचा त्याला पाठिंबा असूनही पंडिता रमाबाईंनीं धर्मान्तर केल्यामुळें शारदासदनांतील अनेक विधवा विद्यार्थिनींनीं तो आश्रम सोडला व त्यांचा विद्यार्जनाचा मार्ग बंद झाला. अण्णांना प्रथमपासून ह्या कार्याविषयीं तळमळ

होतीच. तेव्हां पुनर्विवाह-संस्था अगदीं अलग ठेवून विधवांच्या उन्नति-कार्याला उपयुक्त अशा 'अनाथ बालिकाश्रमाला' इ. स. १८९६ मध्यें त्यांनीं मूर्त स्वरूप दिलें. बहुजनसमाजाची सहानुभूति संपादन करून घेण्यासाठीं सुरुवातीपासून त्यांनीं ह्या संस्थेची व्यवस्था नमुनेदार ठेवण्याची कोशीस केली. कै. काशीबाई देवधर, वेणूताई नामजोशी, कै. तात्या गाडगीळ, श्री. पार्वतीबाई आठवले ह्यांच्यासारखीं बहुगुणी व सेवातत्पर माणसें जोडण्यांत यश मिळवून त्यांनीं संस्थेला चिरस्थायी स्वरूप प्राप्त करून दिलें. पुढें श्री. हरिभाऊ दिवेकर, प्रा. आठवले, प्रा. मायदेव, कै. गो. म. चिपळूणकर, कै. वामनराव जोशी, श्रीमती वारूबाई शेवडे, श्रीमती कमलाबाई देशपांडे व श्रीमती सीताबाई अण्णिगेरी वगैरे निष्ठावंत आजन्म सेवकांची बहुमोल मदत होऊन आज त्या कार्याचा विस्तार 'महिला विद्यापीठ' व 'हिंगणें स्त्री-शिक्षण संस्था' ह्या नांवांनीं ओळखला जात आहे. अण्णांचे कनिष्ठ चिरंजीव श्री. भास्करराव कर्वे ह्यांनीं उच्च विद्याविभूषित झाल्यानंतर ह्या संस्थांना शक्य तेवढें व्यापक स्वरूप देण्याची अविश्रान्त खटपट चालविली असून आज तर ते वर उल्लेखिलेल्या दुसऱ्या संस्थेचे केवळ प्राणच आहेत.

## हिंगणें कीं पुणें ?

अनाथ बालिकाश्रमाचीं पहिलीं सात आठ वर्षें जवळ जवळ अज्ञातवासांत गेलीं. आश्रमाचें अंतिम साध्य म्हणजे अनाथ विधवांच्या आंगच्या सुप्त शक्तींचा विकास घडवून आणून त्यांच्या नीरस जीवनांत आशेचा नवा अंकुर आणि नवी धमक निर्माण करणें. अल्पवयी विधवांची समाजांत जी अवहेलना चालत असे त्यापायीं त्या विद्येच्या अभावीं

अगतिक झालेल्या. ज्ञानदीप त्यांच्या हातीं देऊन आपला मार्ग आपण चोखाळायला त्यांना समर्थ करणें व उल्हसित वृत्तीनें आपल्या जीविताचा उपयोग देशोद्धारासाठीं करायला त्यांना कार्यप्रवण करणें ही अण्णांच्या अंतरींची इच्छा. सुदैवानें प्रिन्सिपल आगरकर ह्यांच्यासारख्या कर्त्या सुधारकाचें त्यांना सक्रिय पाठबळ मिळालें. आश्रमाची सुरुवात पुण्याला झाली खरी परंतु शिक्षणासाठीं निवान्त जागा शहराबाहेर मिळाल्यास बरें, अशा कल्पनेनें अण्णांनीं प्रयत्न चालविले होते. त्यांतच १८९९ सालचा प्लेग उद्भवला. तेव्हां मुक्काम हालविणें भागच होतें. रावबहादुर गोखले नांवाच्या एका सद्गृहस्थांना सद्बुद्धि होऊन त्यांनीं आपुलकीनें आश्रमाची अडचण जाणली व आश्रमाच्या विद्यार्थिनींची आबाळ होऊं नये म्हणून आपल्या हिंगण्याच्या घराचा कांहीं भाग तात्पुरता वापरायला दिला. तेथेंच आश्रमाची कायम सोय करून देण्यासही ते तयार झाले व तत्प्रीत्यर्थ सहा एकर जमीन देणगीदाखल देऊन आजच्या हिंगण्याच्या भरभराटीचा पाया घातला. अशा रीतीनें एका लहानशा झोपडीवजा घराचें बांधकाम होऊन इ. स. १९०० च्या जूनमध्यें हिंगणें येथें आश्रम सुरू झाला.

## समाजसेवकांचा ‘ निष्काम कर्ममठ ’

सर्वसाधारणपणें विधवांच्या शिक्षणाच्या विरुद्ध लोकमत असतांही, आपल्या समाजांत स्त्रीशिक्षणाचें पाऊल पुढें कसें पडेल, विशेषत: त्या वेळच्या महाराष्ट्रांत त्याबद्दल जागृति कशी होईल ह्याची विवंचना अण्णांना अहर्निश लागून राहिली होती. किंबहुना आतां त्यांना ह्याच एका गोष्टीचा ध्यास लागला होता असें म्हटल्यास अधिक शोभेल.

मुलींच्या लग्नाची वयोमर्यादा वाढून संसार व मातृपदाची जबाबदारी घ्यायला त्या पात्र होण्यास मध्यम व गरीब वर्गांतील पालकांनाही मुलींच्या शिक्षणाची सोय उपलब्ध करून दिल्याखेरीज तरणोपाय नाहीं ह्याची खात्री पटल्यामुळें अखेर इ. स. १९०७ च्या सुमारास डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या एका प्रशस्त पण जुन्या घरांत 'महिला विद्यालयाला' मूर्त स्वरूप आलें. आरंभीं अवघ्या सहा विद्यार्थिनींच्या ह्या चिमुकल्या शाळेचें रूपान्तर महाराष्ट्रांतील एका विख्यात आदर्श शिक्षण संस्थेंत कसें झालें ह्याचें वर्णन दिल्यास एक ग्रंथच होईल. अण्णांनीं स्वतः ह्या शाळेंत इंग्रजी घेतलें व त्यांच्यावर पुत्रवत् ममता करणारे त्यांचे प्रेमळ गुरुजी श्रीयुत सोमण ह्यांनीं बाकीच्या विषयांची जबाबदारी पत्करली.

लोकांना हा प्रयोग फार पटला. महिला विद्यालयाला वसतिगृहाची जोड देण्याचीही जरुरी भासूं लागली. परंतु जागेच्या टंचाईमुळें शेवटीं महिला विद्यालयही हिंगण्याला न्यावें लागलें. कै. तात्या गाडगीळ ह्या ध्येयवादी गृहस्थांनीं व त्यांच्या पत्नी पार्वतीबाई ऊर्फ काकूंनीं त्या कामीं आपलें तन मन धन वाहिलें व इतरांकडूनही द्रव्यसाहाय्य मिळवून दिलें. 'अनाथ बालिकाश्रम' व 'महिला विद्यालय' ह्या संस्था पाठच्या बहिणींप्रमाणें खेळीमेळीनें नांदूं लागून झपाट्यानें वाढूं लागल्या व त्यांच्या जनकाच्या इच्छेनुसार अगदीं एकजीव होऊन गेल्या.

प्रा. कर्वे आणि त्यांची सहकारी मंडळी ह्यांनीं निष्काम बुद्धीनें एकत्र येऊन निश्चयानें जें अखंड समाजसेवेचें व्रत घेतलें तें 'निष्काम कर्ममठ' ह्या सूचक व समर्पक नांवानें प्रसिद्ध आहे. फर्ग्युसन कॉलेजांत अण्णांचें अध्यापन कार्य जरी चालूच होतें तरी तेवढेंच करून स्वस्थ

बसावें अशी त्यांची मनोवृत्ति नव्हती. मुंबईला असतांना तेथील मिशनरी संस्थांत अध्यापकाचें काम मिळवून त्यांतील कार्यपद्धतीचें त्यांनीं जवळून निरीक्षण केलें होतें. 'आपल्या समाजांत अशीं निःस्वार्थी माणसं मिळणार नाहींत का? पाहूं या प्रयत्न करून.' ह्या विचारानें ते बेचैन होते व कांहीं तरी त्या दिशेनें पाऊल टाकण्याचा त्यांचा पक्का निर्धार झाला. १९१० च्या सुमारास निष्काम कर्ममठाची कल्पना सत्यसृष्टींत उतरली व केवळ निर्वाहापुरतेंच वेतन घेऊन अत्यंत साध्या व सच्छील राहाणीनें अबलोन्नतीच्या कार्याला काया-वाचा-मन अर्पण करणाऱ्या निवडक स्त्रीपुरुष सेवकांची ही पहिली तुकडी निरलसपणें कामाला लागली.

काम अफाट होतें. एकंदर स्त्रीवर्गाची व त्यांतल्या त्यांत महाराष्ट्रीय भगिनींची सर्व बाजूंनीं कुचंबणा झालेली दिसत असतां ती कोंडी फोडण्याचा चंग बांधून पुढें सरसावण्यास कोणीच तयार नव्हतें. रूढीची मगरमिठी प्रत्येकाला कशी झुगारून देतां येणार? प्रवाहपतिताप्रमाणें समाज ह्या गोष्टीची उपेक्षा करून चालत होता. अशा स्थितींत समाजाला प्रत्यक्ष कार्यानें धक्के देण्याची शक्ति, अल्पस्वल्प प्रमाणांत कां होईना, अण्णांनीं निर्माण केली; नुसती निर्माण केली असें नव्हे तर त्या शक्तीचा समन्वय करून ती पद्धतशीरपणें उपयोजिली. बिंदूतून सिंधु उगवेल अशीं चिन्हें दिसूं लागलीं. आश्रम व महिला विद्यालय नेटानें चालवायला उत्साही कार्यकर्त्यांची उणीव नाहींशी झाल्यावर अण्णांनीं कृतकृत्य झालों असें न मानतां, नवी उमेद धरली व जपानमधील स्त्रियांच्या विद्यापीठाच्या धर्तीवर महाराष्ट्रापुरतीच नव्हे तर इतर प्रांतीयांना सुद्धा उपयुक्त ठरेल अशी उच्च शिक्षणाची संस्था

भारतीय महिलांसाठीं सुरू करण्याचा मानस त्यांनीं १९१५ सालीं मुंबईला भरलेल्या सामाजिक परिषदेपुढें प्रगट केला.

## कौटुंबिक जीवन

अण्णांच्या भारतवर्षीय महिला विद्यापीठाची पूर्वपीठिका देण्यापूर्वीं त्यांचें पुनर्विवाहोत्तर कौटुंबिक जीवन कसें होतें व आहे हें जाणून घेणें आवश्यक आहे.

एक सुधारक पुनर्विवाहित जोडपें म्हणून समाजांत त्यांच्या कुटुंबाकडे पाहाण्याची जनतेची दृष्टि उपहासाची आणि पूर्वग्रहदूषित अशी कित्येक वर्षें असे. परंतु समाजांत राहूनच आपणाला समाजकार्य साधायचें आहे ह्या विचारसरणीची उभयतां पतिपत्नींवर पक्की छाप असल्यामुळें, त्यांनीं ‘ एकांडे सुधारकपणा ’ कधीं केला नाहीं. त्यांच्या पत्नी आनंदीबाई जरी शारदासदनच्या विद्यार्थिनी होत्या तरी त्यांचें बालबोध वळण कधीं सुटलें नव्हतें व आजही त्या जुन्या पिढींतल्या त्यांच्या समवयस्क अशा एकाद्या आजींसारख्या परोपकारी, अनुभवाचें मोठें भांडार जवळ असलेल्या आणि नाना तऱ्हेच्या आठवणी सांगायला कधीं न कंटाळणाऱ्या अशा तुम्हांला आढळतील.

आगरकरांचें ह्या कुटुंबावर नितान्त प्रेम होतें. लग्नानंतर जेव्हां त्यांच्या घरीं कर्वे पति-पत्नींना जेवायला जाण्याचा प्रसंग आला तेव्हां आनंदीबाईंची खणानारळांनीं ओटी भरण्यांत आली. त्यामुळें आनंदीबाईंना किती धन्यता वाटली असेल ह्याची कल्पनाच करावी. माणूसघाणेपणाला त्यांनीं कधीं थारा दिला नाहीं. उलट लोकांमध्यें अधिक मिसळतां यावें, त्यांच्या

अडीअडचणीला उभें राहातां यावें म्हणून त्या मिडवाइफ़्री शिकल्या. त्या वेळीं नागपूरला डफरीन हॉस्पिटलमध्यें एक वर्षांत हा कोर्स संपवितां येत असे. तेथील शिक्षणक्रम हिंदींतून चाले व डॉक्टर प्राध्यापकांना इंग्रजींतून शिकविण्याची मुभा होती. बिचाऱ्या आनंदीबाईंची भाषाज्ञानाच्या अभावीं फार त्रेधा उडे. त्यांतच बरोबर १॥–२ वर्षांचा त्यांचा मुलगा. आज हे शंकरराव कर्वे आफ्रिकेंत मुंबासाला नामांकित डॉक्टर आहेत व सर्व हिंदी पाहुणेमंडळींचा आदरसत्कार करायला ते सदैव तत्पर असतात.

अनाथ बालिकाश्रमांत जाणाऱ्या मुली व त्यांचे पालक नेहमीं अण्णांच्या घरीं येत. त्यांचा कंटाळा न करतां आपल्या हातून होईल तो अतिथीसत्कार करण्यांत त्यांना भूषण वाटे. आनंदीबाईंचा स्वभाव चौकस व अण्णांप्रमाणेंच माणसें जोडण्याची विद्या त्यांना चांगली अवगत असल्याकारणानें त्यांनीं आल्यागेल्याची विचारपूस करावी, कोणाचें बाळंतपण करावें तर कोणाचीं मुलें संभाळावीं. अशा तऱ्हेनें ज्या ज्या उपायांनीं दुःखितांचा दुःखभार हलका होईल तें करीत राहाण्याचा त्यांना आयुष्यभर छंद आहे. त्यांचे द्वितीय चिरंजीव दिनकर हे लहान असतांनाची गोष्ट. अण्णा आपलें कॉलेजचें काम उरकून आले कीं तडक पायपीट करीत हिंगण्याला जायचे. घरचें सारेंच आनंदीबाईंना पाहावें लागे. संसाराबद्दल अनासक्त राहून सदान्‌कदा ते आपल्या संस्थेच्या कामांत गुंग असायचे. त्यामुळेंच कीं काय ते किंचित् तुटक आणि मितभाषी बनले असावेत. हिंगण्याला बिऱ्हाड नेल्यावर आपल्या नित्याच्या भिक्षांदेही-साठीं अण्णा कोठें तरी गेले होते. इकडे मोठा मुलगा तापानें फणफणून गेला. जवळ जवळ दोन अडीच महिने जिवाला घोर. एक मात्र समाधान होतें. आश्रमांतील मुलींनीं तितक्याच आपुलकीनें शुश्रूषेला मदत केली.

त्यानंतर सर्व कांहीं ठाकठीक होऊन हें कुटुंब परत पुण्यांत राहूं लागलें व मुलांच्या शिक्षणाला व अण्णांच्या विद्यापीठाच्या कार्याला एकदमच सुरुवात झाली.

## भारतवर्षीय महिला विद्यापीठ

एके दिवशीं नित्यक्रमाप्रमाणें अण्णा आश्रमांतील कागदपत्र पाहाण्यांत गर्क झाले असतां, त्या दिवशींच्या टपालानें आलेली एक पुस्तिका त्यांच्या नजरेला पडली. कामाच्या गर्दींत अण्णांनीं लागलीच तिचें वाचन केलें नव्हतें; पण लौकरच त्यांना न्यायमूर्ति सर नारायण चंदावरकर ह्यांचें पत्र आलें. मुंबईच्या कॉंग्रेस (१९१५) अधिवेशनाच्या वेळीं सामाजिक परिषदही भरायची होती व तिचें अध्यक्षस्थान अण्णांनीं भीतभीतच स्वीकारलें. गाजावाजा न करतां, आपलें काम बरें कीं आपण बरे अशा पद्धतीनें वागणाऱ्या एकमार्गी अण्णांना जनतेच्या व्यासपीठावरून आपलें हृद्गत व्यक्त करण्याची ही सुवर्णसंधि मिळाली. त्यांनीं त्या पुस्तिकेचा आधार घेऊन जपानमधील 'विमेन्स युनिव्हर्सिटीच्या' धर्तीवर आपल्या इकडे स्त्रियांच्या नैसर्गिक प्रवृत्ति व आवडीनिवडी लक्षांत घेऊन त्यांना राष्ट्राच्या अभ्युदयासाठीं झटण्याची पात्रता आणून देणारें विश्वविद्यालयीन दर्जाचें शिक्षण देण्याची आवश्यकता प्रतिपादन केली.

अण्णांनीं स्वशिरावरच हा अभिनव प्रयोग करून पाहाण्याची जबाबदारी घेतली. आश्रमांतील मंडळींचा पाठिंबा मिळतांच अण्णांचा उत्साह द्विगुणित झाला व फूल ना फुलाची पाकळी म्हणून कै. गाडगीळांनीं आपली १० हजारांची देणगी देण्याची मनीषा तावडतोब व्यक्त केली.

क्षणाचाही विलंब न करतां अण्णांनीं अखिल हिंदुस्थानांत प्रचारार्थ दौरे काढले. गुजराथ, पंजाब, संयुक्त प्रांत, बंगाल, इत्यादि ठिकाणीं असंख्य लोकांना भेटून त्यांनीं निधि गोळा केला. सभासद मिळविले. मग सभासदांनीं सिनेट निवडलें. डॉ. भांडारकर प्रभृति अकरा जणांचें सिंडिकेट स्थापन होऊन ता. ३ जून, १९१६ ह्या मंगल दिनीं भारतवर्षीय महिला विद्यापीठाचा जन्म झाला.

'महाराष्ट्रासाठीं मातृभाषेंतून सर्व विषयांचें ज्ञान महिलांना करून देणारी' हिंदुस्थानांतील ही पहिलीच स्त्रियांची युनिव्हर्सिटी होय.

भारतीय स्त्रियांच्या गेल्या ३०।३२ वर्षांतील अपूर्व जागृतीचा इतिहास हें आमच्या राष्ट्राचें अमोल धन आहे. महात्मा गांधींनीं राजकीय क्षितिजावर ब्रिटिश सत्तेशीं झुंज घेतां घेतां अखिल राष्ट्रांत नवचैतन्याची लाट उसळविली व स्त्रियांची पारंपारिक कोंडमाऱ्यांतून मुक्तता केली. महर्षि कर्वे ह्यांची तपस्याही अशीच थोर आहे. स्त्रीसमाजासाठीं त्यांनीं हाडांचीं काडें करून एक नवा विचारप्रवाह प्रसृत केला. मातृभाषेच्या माध्यमाचा आश्रय घेऊन अबलांना सबल करण्याचें कंकण हातीं बांधलें आणि धडाडीनें प्रत्येक संकटाला तोंड देऊन स्त्रीदास्यविमोचनाचा एक समाजविहित मार्ग उपलब्ध करून देण्यांत अभूतपूर्व यश मिळविलें.

## महात्माजींचा आशीर्वाद

महिला विद्यापीठाचें कॉलेज हिंगण्यास सुरू झालें. त्याच सुमारास दक्षिण आफ्रिकेंतील सत्याग्रहाची चळवळ संपवून महात्मा गांधी परतले होते. अनाथ बालिकाश्रमाची कार्यपद्धति त्यांना फारच आवडली व त्याबद्दल

त्यांनीं प्रशंसोद्गारही काढले. अण्णांच्या विद्यापीठाला त्यांनीं शुभाशीर्वाद दिला. स्त्रियांसाठीं स्वतंत्र विद्यापीठ अवश्य असलें पाहिजे, त्यांत आजवर अवमानिलेल्या मातृभाषेचें योग्य स्थान मान्य करण्यांत आलें पाहिजे व प्रपंचशास्त्र, मानसशास्त्र, समाजशास्त्र अशा उपयुक्त शास्त्रीय ज्ञानाबरोबरच स्त्रियांना नैसर्गिक आवड असते अशा संगीत, चित्रकला, इत्यादि कलांचाही अंतर्भाव केला म्हणजे त्यांचें शिक्षण एकांगी न होतां, बहुश्रुतपणाच्या जोडीला त्यांच्या ठिकाणीं कलाभिज्ञताही येईल ह्या अण्णांच्या मूलभूत कल्पनांशीं गांधीजी सहमत झाले. एका बाबतींत मात्र त्यांचा मतभेद होता. इंग्रजी भाषेचा अभ्यास सर्व कोर्समध्यें विद्यापीठानें आवश्यक ठरविला होता हें बापूजींना पटत नव्हतें. प्रांतिक भाषांच्या पुनरुद्धाराचा काळ नजीक आला आहे, तेव्हां इंग्रजीचें शिक्षण सक्तीचें न करतां ऐच्छिक म्हणून ठेवावें असा बापूजींचा सल्ला होता.

अण्णांना त्या परिस्थितींत व अजूनही सुसंस्कृत व्यक्तीचें इंग्रजीवांचून अडेल असें वाटतें. इंग्रजी ही आज सुधारलेल्या निम्या जगाची भाषा असतांना, तिच्या ज्ञानावांचून विद्यार्थिनींच्या ज्ञानाला परिपूर्णता येणार नाहीं म्हणून अण्णा ह्या प्रश्नावर आग्रह धरून बसले. तथापि महात्माजींनीं आपली सक्रिय सहानुभूति ह्या महान् कार्याकडे वळवून वार्षिक दहा रुपयांची वर्गणी द्यायला सुरुवात केली व संस्थेच्या मतदार संघांत आपलें नांव समाविष्ट केलें. पुढें राजकीय चळवळीच्या झंझावातांत ते सापडले. तेव्हांपासून त्यांचा ह्या कार्याशीं प्रत्यक्ष संबंध उरला नाहीं. तरीही विद्यापीठाच्या उत्कर्षाकडे ते नेहमींच आपुलकीच्या भावनेनें पाहात आलेले असल्यामुळें पंतप्रधान बाळासाहेब खेर ह्यांनीं केलेल्या पदवीदानसमारंभाच्या

भाषणाच्या वेळीं ( १९३९ ) उपस्थित राहून त्यांनीं आपली अभिजात गुणग्राहकता व अंतरींची कळकळ व्यक्त केली.

## पहिलीं कठीण वर्षें

हिंदुस्थानांतील व हिंदुस्थानाबाहेरील सुविख्यात समकालीन शिक्षण-तज्ज्ञांकडून अण्णांना भरपूर पाठिंबा मिळाला. तरी अशा स्वतंत्र विद्यापीठाच्या वाढत्या संसाराला आवश्यक तो निधि मिळविणें कांहीं सोपें नव्हतें. विद्यापीठाला सरकारमान्यता मिळाल्याखेरीज त्यांतून बाहेर पडणाऱ्या पदवीधरांना कमी लेखण्यांत येईल ह्या भीतीनें विद्यार्थिनींचा ओघही वळावा तसा तिकडे वळेना. हिंगण्याच्या महिलाश्रमांतील प्रवेश-परीक्षा उत्तीर्ण झालेल्या चार मुली व सुप्रसिद्ध दिवंगत साहित्यिक तात्यासाहेब केळकर ह्यांच्या सुकन्या श्रीमती कमलाबाई देशपांडे, ह्या त्या वेळीं मुंबई मॅट्रिक झालेल्या पांचव्या, अशा पांच विद्यार्थिनींचें "कर्वे कॉलेज" सुरू झालें ( ५ जुलै, १९१६ ). अशा तऱ्हेनें धिम्या गतीनें कां होईना पण प्रत्यक्ष कार्याला आरंभ होऊन १९१९ अखेर पहिली जी. ए. व पुढील सालीं तीन जी. ए. अण्णासाहेब कर्व्यांची मनीषा सफल करून आपापलें कार्यक्षेत्र शोधूं लागल्या. तो आनंद अण्णांच्या आयुष्यांतील मानसिक विसाव्याचें स्थान आहे.

पहिलीं चार वर्षें निव्वळ मध्यम वर्गीयांकडून वर्गणीरूपानें मिळविलेल्या पैशांवर ही संस्था अण्णांनीं कशी चालविली असेल ह्याचा अचंबा वाटतो. अथवा आश्चर्य तरी कसलें? शिक्षणाविषयीं खरा जिव्हाळा असलेले कुशल अध्यापक हें अण्णांचें मोठें भांडवल होतें. त्या अध्यापकांनीं पैशाच्या वा मानाच्या लालसेनें नव्हे, तर सद्भावानें प्रेरित

होऊन अण्णांना साथ केली म्हणूनच विद्यापीठ अनेक आपत्तींतून निभावून गेलें. नाहीं तर " उत्पद्यन्ते विलीयन्ते दरिद्राणां मनोरथाः " असाच प्रकार व्हायचा.

चार वर्षांअखेर खर्चवेंच जाऊन संस्थेजवळ २,१६,००० रुपयांची शिल्लक झाली. अण्णांचा हिशेबीपणा सुप्रसिद्धच आहे. एक पैचीही कोठें अफरातफर झाली नाहीं. प्रत्यक्ष मुलांना शिक्षणाला पैसा दिला तोही कर्ज म्हणून! इतका चोखपणा व्यवहारांत क्वचितच दिसून येईल. आपल्या मुलाबाळांची विवंचना करीत न बसतां, त्यांनीं आपल्या मिळकतींतील मोठा हिस्सा संस्थेला दिला. Charity begins at home ह्याचा अर्थ त्यांच्या बाबतींत हिंदु विडोज होम असा होता. एकदा तर त्यांनीं स्वतःच्या नांवानें उतरलेला ५००० रुपयांचा विमा आश्रमाच्या नांवानें करून दिला. पण ह्याहीपेक्षां त्यांचें मनौदार्य ह्या गोष्टींत दिसून येतें कीं, लोकमान्यांप्रमाणें लोकसंग्रह करण्याच्या उदात्त हेतूनें अगदीं गरीब लोकांकडून पै-पैसा मिळविण्यासाठीं, १९१६ ते १९२० ह्या काळांत पेशावरपासून त्रिचनापल्लीपर्यंत आणि अंबाल्यापासून कलकत्त्यापर्यंत हिंडण्यांत त्यांनीं अक्षरशः देह झिजविला.

## दानशूर सर विठ्ठलदास ठाकरसी

महाराष्ट्रांत दातृत्वशक्ति फार मर्यादित आहे असें म्हणतात. परंतु जें कांहीं दिलें जातें तें सहानुभूतीच्या ओलाव्यानें. म्हणूनच ह्या वेळीं ठाण्याचे समाजहितैषी थोर कार्यकर्ते कै. वि. ल. भावे ह्यांनीं स्वयंस्फूर्तीनें विद्यापीठाला मदत म्हणून आपल्या मातुःश्रींच्या नांवें पन्नास हजारांची

उदार देणगी स्वीकारण्याची अण्णांना विनंती केली. ह्या गोष्टीचें विशेष मोल आहे. आपल्या मातु:श्रींचें नांव कॉलेजला द्यावें एवढीच श्री. भावे ह्यांची शर्त होती.

इतक्यांत अचानकपणें सर विठ्ठलदास ठाकरसींच्या पंधरा लाखांच्या भव्य देणगीच्या रूपानें विद्यापीठाचें भाग्य फळफळलें. विद्यापीठाला व तज्जन्य शिक्षण संस्थांना आपल्या मातु:श्रींचें नांव देण्यांत यावें अशी सर विठ्ठलदास ह्यांचीही आग्रहपूर्वक अट असल्यामुळें, श्री. भाव्यांच्या चालत आलेल्या मोठ्या देणगीलाही कष्टानें नकार देणें भाग पडलें, ह्याबद्दल अण्णांना अतिशय हळहळ वाटली.

सर विठ्ठलदास व लेडी ठाकरसी ह्यांच्यांसारखीं आस्थेवाईक, शिक्षणप्रेमी आणि दानशूर माणसें हीं आमच्या गरीब देशाचीं भूषणेंच नव्हेत का? वास्तविक विद्यापीठाला एक हजार रुपयांची एक देणगी देऊन त्यांनीं अगोदरच संस्थेविषयीं प्रेम व्यक्त केलें होतें. आतां अनाहूत आणि अकल्पितपणें विद्यापीठाचें भवितव्य घडविण्याच्या कामीं आपला वांटा उचलायला ते सिद्ध झाले ह्याच्या पाठीमागें एक मनोज्ञ घटना आहे. तिचा उल्लेख येथें केल्यावांचून राहावत नाहीं.

इ. स. १९१९ मध्यें अनाथ बालिकाश्रमाच्या एक आजन्म सेविका श्रीमती सीताबाई अण्णिगेरी ह्यांना अण्णांच्या मदतीनें लेडी ठाकरसीं-बरोबर जगाचा प्रवास करण्याची सुसंधि मिळाली. जपानमध्यें स्त्रियांची युनिव्हर्सिटी केवढें कार्य करून राहिली आहे हें प्रत्यक्ष पाहिल्यानंतर ठाकरसी पतिपत्नींना अपरिमित आनंद झाला व त्या विद्यापीठानें अनुसरलेल्या मार्गानेंच भारतवर्षीय महिला विद्यापीठाचें पाऊल प्रगति-

पथावर निश्चित पडत आहे असें सीताबाईच्या तोंडून कळल्यावर हिंदुस्थानांत पाऊल टाकतांच ठाकरसींनीं आपला विशाल मनोदय अण्णांना कळविला.

## श्रीमती ना. दा. ठा. भारतवर्षीय महिला विद्यापीठ

कर्वे कॉलेजच्या तडफदार माजी विद्यार्थिनींच्या चलाख वृत्तीचा पूज्य ठाकरसींच्या विशाल राष्ट्रीय दृष्टिकोनाशीं मेळ बसून महिला विद्यापीठाला आर्थिक दृष्ट्या स्थैर्य आलें. वर उल्लेखिलेल्या अभिनव स्वरूपांत 'वुइमेन्स युनिव्हर्सिटी' लोकांपुढें आली ( १९२० ). कै. गो. म. चिपळूणकरांनीं आधींच अल्प प्रयत्न म्हणून पुण्याला चालू केलेल्या आश्रमाच्या कन्याशाळेला 'एस्. एन्. डी. टी. कन्याशाळा, पुणें' हें नांव मिळालें व नाथीबाई कॉलेज येरंडवण्याच्या परिसरांत बांधलें गेलें. नंतर मुंबईत विद्यापीठानें स्वतःची आणखी एक कन्याशाळा स्थापन केली (१९२४) व त्या जागेंतच सकाळीं स्त्रियांचें कॉलेजही चालविण्यांत येऊं लागलें. अहमदाबाद, सुरत, बडोदें, नागपूर, सातारा, मालवण, रत्नागिरी, सांगली, बेळगांव, इत्यादि प्रमुख ठिकाणीं विद्यापीठाच्या धोरणानुसार स्त्रीशिक्षणसंस्था परिश्रमपूर्वक निघाल्या व त्या सर्वांची भरभराट उत्तरोत्तर अधिकाधिक होत असून कै. सर विठ्ठलदास ह्यांच्या आकांक्षा सफल होण्याचीं सुचिन्हें स्पष्ट दिसूं लागलीं आहेत.

शक्य तों आपलें वैशिष्ट्य संभाळून अभ्यासक्रम ठरविण्याच्या बाबतींतील विद्यापीठाला असलेलें स्वातंत्र्य न गमावतां सरकार-मान्यता मिळवावी हें उद्दिष्ट पाळण्यांत मोठें औचित्य आहे. मातृभाषांचा

पद्धतशीर अभ्यास करवून घेऊन सर्व शिक्षण मातृभाषेच्या द्वारें अत्यंत उच्च पातळी संभाळून पूर्ण करतां येतें हें प्रामुख्यानें महाराष्ट्रीय व गुजराथी भगिनींनीं आजवर सिद्ध केलें आहे. मुंबई सरकारनें विद्यापीठाच्या गृहितागमांना ( G. A. ) बी. ए. समजून व प्रदेयागमांचा ( P. A. ) दर्जा एम्. ए. बरोबरीचा आहे ह्याला मान्यता देऊन विद्यापीठाचा यथोचित गौरव केला आहे व त्यामुळें विद्यापीठाला स्वतंत्र भारतांत उज्ज्वल भवितव्य दिसत आहे हें दृश्य पाहून प्रत्येक सुविद्य माणसाच्या नेत्रांत ह्या प्रसंगीं आनंदाश्रु चमकतील.

## युरोपची यात्रा व जागतिक शिक्षण परिषद

कोणतीही संधि फुकट न घालवितां तिचा होईल तितका जास्तींत जास्त फायदा अंगीकृत कार्याकरितां करून घेण्याची विलक्षण हातोटी अण्णांना साधलेली आहे. ' साधनानां अनेकता ' अशी त्यांची श्रद्धा व ह्या श्रद्धेच्या पोटीं साहस करण्यांत ते कोणालाच हार जाणार नाहींत. १९१४ सालींच फर्ग्युसन कॉलेजांतील अध्यापनाचें काम सोडून देऊन अण्णा एका अर्थानें सेवानिवृत्त तर दुसऱ्या अर्थानें पूर्ण सेवाव्यापृत झाले होते. कारण आतां त्यांना आपला सर्व वेळ आणि सर्व शक्ति आश्रमाच्या उद्दिष्टांकरितां खर्च करणें शक्य झालें. ज्या वयांत इतर माणसें शारीरिक दुर्बलतेमुळें विकल होऊन परमार्थाचा विचार करूं लागतात, तीर्थाटनाचे बेत रचतात आणि अखेर काशीयात्रेला जातात त्या वयांत म्हणजे वयाच्या ७१ व्या वर्षी अण्णांच्या मनांत परदेशगमनाची लाट उसळली ( १९२९ ).

त्या वर्षीच्या जुलैमध्यें जिनीव्हा येथें जागतिक शिक्षण परिषद भरणार होती. ह्या अधिवेशनाला हजर राहून आपल्या शिक्षणविषयक कल्पनांचा प्रचार करावा, जमल्यास निधि गोळा करावा व विशेषत: युरोपियन स्त्री-पुरुषांना हिंदुस्थानांतील आपल्या प्रयोगाची माहिती करून द्यावी म्हणून अण्णा निघाले. प्रवास-खर्चाची तरतूद करणें अवश्य होतें; कारण अण्णांनीं आपल्या आवडत्या ध्येयासाठीं फकिरी पत्करली होती. तरुणांनाही लाजविणारी त्यांची धडाडी व कार्यकुशलता विद्यापीठाच्या अधिकारी वर्गाला चांगली परिचित असल्यामुळें त्यांनीं पांच हजार रुपये देऊं केले व अण्णांचे पाय एकदाचे बोटीला लागले.

इकडे त्यांच्या पत्नी आनंदीबाई ह्या वेळीं मुळुमुळू रडत न बसतां अखिल हिंदुस्थानभर हिंडल्या. आपल्या पतीच्या कार्यांत जी कांहीं भर घालतां येईल ती घालण्यास बद्धपरिकर झाल्या. हिंदुस्थान सोडण्यापूर्वी अण्णांनीं आत्मवृत्ताची पहिली आवृत्ति काढली होती व त्यापायीं त्यांना तेराशें रुपयांचें देणें झालेलें होतें. आनंदीबाईंना स्वस्थ बसवेना. त्यांनीं पुस्तकें खपविण्याचें मनावर घेतलें. कर्जफेड होऊन बाईंच्या मेहनतीचा फायदा त्यांना कमिशनरूपानें मिळाला. खर्चाची भगभग मिटली पण सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे खूप माणसांचा परिचय होऊन कर्वे विद्यापीठाचा संदेश देशाच्या कोनाकोपऱ्यांत पसरविण्यांत त्यांचे दिवस मजेंत निघून गेले.

अण्णांच्या एक बुद्धिमान् विद्यार्थिनी कमलाबाई देशपांडे ह्यांना त्यांच्या वडिलांनीं म्हणजे तात्यासाहेब केळकरांनीं प्रकृतिस्वास्थ्यासाठीं अण्णांच्या बरोबर पाठविलें होतें. अण्णांसारख्या पितृतुल्य व्यक्तीच्या सहवासांत

कमलाबाईंनीं इंग्लंड पाहिलें व तेथील कित्येक शिक्षण संस्थांना भेटी देऊन त्यांनीं पुढील ध्येय निश्चित केलें. विद्याव्यासंगाची त्यांची उपजत हौस पुन्हा एकवार उचंबळून आली व उत्तम मार्गदर्शक लाभल्यामुळें प्राग युनिव्हर्सिटीच्या पीएच्. डी. साठीं त्यांनीं विद्वत्तापूर्ण असा लिहिलेला प्रबंध मान्य होऊन त्या आतां डॉ. कमलाबाई देशपांडे म्हणून साहित्यप्रेमी रसिकांच्या अंतःकरणांत आदराचें स्थान पटकावून बसल्या आहेत.

युरोपच्या दौऱ्यावर असतां अण्णांना प्रि. हरिभाऊ दिवेकर व त्यांचे चिरंजीव भास्करराव ह्यांची फार मदत झाली. स्वित्सर्लंडमधील शिक्षण परिषद आटोपून ते परत येणार तोंच अमेरिकेच्या वाटेनें जपानमधील स्त्रियांचें विद्यापीठ पाहून यावें असा ठाम बेत त्यांनीं केला व मग १७ सेप्टेंबर, १९२९ ला हॅम्बुर्ग बंदराचा किनारा सोडून ते न्यूयॉर्कला जायला निघाले. वॉशिंग्टन, पिट्सबर्ग, डिट्रॉइट, शिकागो व लॉस एंजल्स अशा मुख्य शिक्षणकेंद्रांना भेट देऊन प्रसंगोपात त्यांनीं व्याख्यानें दिलीं व एकूण सत्तावीस हजारांची मदत महिला विद्यापीठासाठीं मिळविली. अण्णांना सुपारीच्या खांडाचेंही व्यसन नाहीं. साधी राहाणी, साधा आहार आणि साधें ध्येयनिष्ठ जीवन. ह्यामुळें स्वतः हातानें दाढी करण्याची सवय नाहीं आणि सलूनमध्यें करवल्यास तिकडे दर खेपेस एक शिलिंग खर्च यायचा म्हणून त्यांनीं दाढी वाढविली. इतकी काटकसर करूनही त्यांना रु. १२७०० खर्च आला व महिला विद्यापीठाच्या प्रचारकार्यास्तवच तो झाला असल्यानें त्यांनीं मोठ्या मनानें तो मंजूर केला. तरीही विद्यापीठाच्या कायम निधींत ते घसघशीत भर घालूं शकले, ह्यांतच त्यांना धन्यता वाटली.

सॅन फ्रान्सिस्कोला अमेरिकेचा निरोप घेऊन १९३० च्या जानेवारी महिन्यांत त्यांनीं याकोहामा बंदरांत पाय ठेवला. तेथून ते टोकियोला गेले. त्या वेळीं नुकत्याच होऊन गेलेल्या भूकंपानें स्त्रियांच्या युनिव्हर्सिटीचें फार नुकसान झालेलें होतें. बहुतेक इमारती नामशेष झाल्या असल्या तरी त्याबद्दल यत्किंचित् न हळहळतां पुन्हा बांधकामाला सुरुवात झाली होती. कुलगुरु **आसो** ह्यांनीं त्यांचा उत्तम सन्मान केला व सर्व माहिती दिली. पुढें कोबे, शांघाय, हाँगकाँग ह्या मार्गानें मलायाला वळसा घालून अण्णांनीं १९३० च्या एप्रिल महिन्यांत जगाची सफर पूर्ण केली व आपल्या कनिष्ठ चिरंजीवांचें लग्न उरकून, ते आपल्या पत्नीसमवेत आफ्रिकेच्या दौऱ्यावर निघाले.

आफ्रिकेंत मुंबासाला डॉ. शंकरराव कर्वे ह्यांना व कुटुंबांतील मंडळींना भेटून अण्णा लागलीच कामाला लागले. आनंदीबाईंनींही ह्या वेळीं दोन हजार वर्गणी जमविली. केपटाउनला ते गेले असतांना ना. शास्त्री, सौ. सरोजिनी नायडू व सी. एफ्. अँड्रयूज ह्यांच्या भेटीगांठी झाल्या. दक्षिण आफ्रिकेंतील बहुतेक प्रवास थोडक्यांत झाला. तेथील हिंदी लोकांमध्यें प्रचाराचें काम उत्तम तऱ्हेनें पार पडून एकंदर चौतीस हजारांचा निधि जमला व महिला विद्यापीठाची आर्थिक बाजू सावरण्यास अविश्रान्त झिजून अण्णा १२ मार्च, १९३२ रोजीं परत आले.

## ठाकरसींची ग्रँट बंद

विद्यापीठाचें कार्यक्षेत्र वृद्धिंगत होत असतां व त्याचा उत्तम जम बसत असतां १९३२ मध्येंच एक अकल्पित संकट विद्यापीठावर कोसळलें.

५२,५०० रुपयांच्या वार्षिक व्याजावर अवलंबून विद्यापीठानें आपला व्याप वाढविला होता. फेब्रुवारीअखेर मासिक हप्त्यानें येणारी रक्कम ट्रस्टींकडून आली होती. सर विठ्ठलदास ह्यांच्या सर्व अटी विद्यापीठाकडून पाळल्या गेल्या नाहींत म्हणून पुढील हप्ते येईनासे झाले. आजन्म सेवकांच्या व सर्व शिक्षकांच्या तुटपुंज्या वेतनांत अधिकच कपात करावी लागली.

अशा आणीबाणीच्या वेळीं युनिव्हर्सिटीचे कर्णधार कै. न्या. पाटकर ह्यांनीं खंबीरपणा दाखविला. विद्यापीठाचा खर्च सालीना सत्तर हजारांच्या घरांत गेला असतां साडेबावन्न हजारांची ही तूट भरून काढून विद्यापीठाची नौका तरती ठेवणें सामान्य काम नव्हतें. जनतेनें दाखविलेला ह्या वेळचा जिव्हाळा व महर्षि कर्व्यांच्या महत्तम कार्याची राखलेली बूज स्मृतिपटलावरून कधींही पुसली जाणार नाहीं. सडेतोड वृत्तीपेक्षां कायदेशीर तडजोड व सामोपचार ह्या मार्गांनीं महाप्रयासानें कै. पाटकर ह्यांना यश मिळालें. लेडी प्रेमलीलाबाई ठाकरसी ह्यांचाही ह्या यशांत थोडाथोडका वांटा नाहीं. त्यांनीं सर विठ्ठलदास ह्यांच्या पावलावर पाऊल टाकून स्त्रियांच्या उद्धाराच्या ह्या अनुपम कार्याला तळमळीनें वाहून घेतलें व वाईटांतून कधीं कधीं चांगलें निघतें ह्या म्हणीप्रमाणें आज लेडी ठाकरसींच्या रूपानें महिला विद्यापीठाला नवजीवन मिळालें आहे, हें कोणालाही पटेल.

## अण्णांचीं नवीं ध्येयें

थोर व त्यागी महर्षींची वृत्ति वसुधैव कुटुंबकम् अशी असते. तेव्हां सुलाखून निघालेल्या सोन्याप्रमाणें विद्यापीठाचा कारभार सुरळीतपणें चालू लागल्यावर अण्णांनीं त्यांतून प्रत्यक्ष अंग काढून घेतलें असलें तरी

विभाग ०१
क्रमांक ३३ ७
नों. दि. ३

अद्याप ते विद्यापीठाच्या कार्यकारिणीचे सन्मान्य सभासद आहेत. संस्थापक म्हणून त्यांचें हिंदी विद्यापीठांच्या इतिहासांतील स्थान विश्वभारतीचे गुरुवर्य टागोर व बनारस हिंदु विद्यापीठाचे पंडित मालवीय ह्यांच्या तोडीचें आहे. परंतु अण्णांना निरंतर कार्यरत राहून जास्तींत जास्त समाजसेवा साधायची आहे. ते एक साधक आहेत, मुमुक्षु आहेत, समाजांतील अनंत दु:खांनीं त्यांच्या अंत:करणाला पीळ पडतो व आपल्याला सुचेल त्या मार्गानें त्या दु:खाचा मोक्ष करायला ते क्षणशः आणि कणशः झटत आहेत. विद्यापीठाचा लौकिक वाढून त्याचें सुप्रतिष्ठित स्वरूप पाहायला ते तळमळत आहेत. विद्यापीठाला चार्टर मिळाल्यावर तें जगन्मान्य होईल ह्याबद्दल त्यांना मुळींच शंका नाहीं. " मी, माझी पत्नी, माझीं मुलें " हें ममत्व विसरून त्यांनीं स्त्रीवर्गासाठीं म्हणजे दुसऱ्या शब्दांत समाजोन्नतीसाठीं आपली तनु वाहिली आहे. त्यांनीं ज्या भव्य नैतिक पायावर निष्काम कर्ममठाची उभारणी केली त्याचें मूल्य आजतागायत यत्किंचित् कमी झालेलें नाहीं हें त्यांच्या हल्लींच्या अविरत उद्योगावरूनही दिसून येईल.

आपल्या राष्ट्राचें दैन्य दूर व्हायला त्यांत विचारजागृति व शिक्षण हीं प्रभावी साधनें आहेत. म्हणून करवेल तितकी समाजोद्धाराची चळवळ त्यांनीं नव्वदाव्या वर्षींही करायची सोडलेली नाहीं. आपल्या देशांत प्रादेशिक विद्यापीठें स्थापन होण्याच्या मार्गाला आहेत. महिला विद्यापीठांचाही असाच उपक्रम सर्व प्रांतांतून झाल्यास महिलावर्गाची राष्ट्रकार्याला अजोड जोड मिळूं शकेल हा त्यांचा दुर्दम्य आशावाद आहे. खेड्यांतील लहान वस्तीमुळें सरकारी प्राथमिक शाळा काढणें अशक्य म्हणून स्वावलंबनाच्या बळावर स्वार्थत्यागपूर्वक चाललेल्या

कितीतरी प्राथमिक शाळा अण्णांनीं अलीकडे चालू करून दिल्या आहेत. त्यासाठीं कितीही क्षुल्लक वर्गणी मिळाली तरी निरुत्साही न होतां ते आपला मार्ग चोखाळीत आहेत.

दुसरी गोष्ट म्हणजे समता-संघ. ही एक जागतिक संस्था असून हिंदुस्थानांतील तिच्या शाखेचें जनकत्व अण्णांकडेच आहे. समता तत्त्व भारतीय संस्कृतीला नवें नाहीं पण तिचें दैनंदिन जीवनांत पालन करून इतरांच्या विचारांना वळण देण्याचें सामर्थ्य तपस्वी जनांशिवाय आणखी कोणांत आढळणार? अण्णा असे महान् तपस्वी, त्यागी, संयमी आणि कर्मयोगी आहेत. स्वतःच्या संसारांत फाजील मन न घालतां, त्यांनीं उध्वस्त झालेला हिंदभूचा संसार सुधारून देण्याची जीवापाड खटपट केली, आपद्ग्रस्तांना हात दिला, सतत पाऊणशें वर्षे आपलें ज्योतिर्मय जीवन नंदादीपाप्रमाणें शांतपणें प्रकाशित ठेवून भारताची उज्ज्वल परंपरा उजळविली. हा नंदादीप असाच उजळत राहो... 'तमसो मा ज्योतिर्गमय' एवढीच नम्र प्रार्थना.

ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.

# कर्वे पति-पत्नींचीं आत्मवृत्तें

## संक्षिप्त आत्मवृत्त

अण्णासाहेबांचें छोटें चरित्र वाचल्यानंतर त्यांच्यासंबंधीं अधिक माहिती मिळविण्याची पुष्कळ वाचकांत उत्सुकता उत्पन्न होईल. अशा वाचकांनीं, खुद्द अण्णासाहेबांनीं लिहिलेलें ' आत्मवृत्त ' वाचावें. बरेंच मोठें पुस्तक आहे हें. सर्वच लहान मुलांना तें वाचणें जुळणार नाहीं. यासाठीं अण्णासाहेबांच्या धाकट्या सुनबाईंनीं खास मुलांसाठीं त्यांच्या देखरेखीखालीं ' संक्षिप्त आत्मवृत्त ' तयार केलें. त्यामुळें ही अडचण चांगल्या तऱ्हेनें दूर झाली आहे. इंग्रजी शाळांतील वरच्या वर्गांत पुरवणी वाचनासाठींहि याचा चांगला उपयोग होतो.

★ मूल्य बारा आणे

## माझें पुराण

महर्षि अण्णासाहेब कर्वे यांच्या पत्नी सौ. आनंदीबाई कर्वे यांनीं आपल्या आजारीपणांत स्वतःच्या मनाला कांहीं तरी व्यवसाय म्हणून ही आत्मकथा लिहावयास घेतली, कुटुंबियांना करमणुक म्हणून वाचायला दिली. साऱ्यांनाच ती आवडली. त्यांच्या सुनबाईंना वाटलें, आपल्यापुरतीच ही आत्मकथा कशाला ठेवायची ! जरा ठाकठीक करून साऱ्या लोकांनाच कां नाहीं वाचायला मिळूं. सुनबाईंची ही कल्पना सर्वांनाच आवडली आणि हें पुस्तक प्रसिद्ध झालें. आनंदीबाईंचें मोठेपण एका मोठ्या पुरुषाची पत्नी म्हणूनच केवळ आहे, असें नाहीं. त्यांच्या परीनें त्या मोठ्या असून त्यांच्या आयुष्यांतील अनुभवहि मोठे आहेत. "कोणी कांहीं म्हटलें, तरी आपल्याला जें वाटतें, पटतें, तें करीत राहायचें. कोणी निंदो नाहीं तर वंदो. ज्याला मिशनरी बाणा म्हणतात तो आनंदीबाईंच्या अंगीं पूर्ण आहे. समाजानें दूर लोटलेल्या, झिडकारलेल्या, तिरस्कारलेल्या मुलांसाठीं त्यांनीं कितीतरी केलेलें आहे." विशेष गाजावाजा होऊं न देतां सतत सेवारत राहाणाऱ्या या महिलेचें हें ' आत्मपुराण ' महाराष्ट्रांतील प्रत्येक महिलेनें एक वेळ तरी वाचावें, ऐकावें.

मूल्य सव्वा रुपया

केशव भिकाजी ढवळे मुंबई ४

IRBK-0103170

IRBK-0103170

# कर्वे पति-पत्नींचीं आत्मवृत्तें

## संक्षिप्त आत्मवृत्त

अण्णासाहेबांचें छोटें चरित्र वाचल्यानंतर त्यांच्यासंबंधीं अधिक माहिती मिळविण्याची पुष्कळ वाचकांत उत्सुकता उत्पन्न होईल. अशा वाचकांनीं खुद्द अण्णासाहेबांनीं लिहिलेलें 'आत्मवृत्त' वाचावें. बरेंच मोठें पुस्तक आहे हें. सर्वच लहान मुलांना तें वाचणें जुळणार नाहीं. यासाठीं अण्णासाहेबांच्या धाकट्या सुनबाईंनीं खास मुलांसाठीं त्यांच्या देखरेखीखालीं 'संक्षिप्त आत्मवृत्त' तयार केलें. त्यामुळें ही अडचण चांगल्या तऱ्हेनें दूर झाली आहे. इंग्रजी शाळांतील वरच्या वर्गांत पुरवणी वाचनासाठींहि याचा चांगला उपयोग होतो.

★ मूल्य बारा आणे

## माझें पुराण

महर्षि अण्णासाहेब कर्वे यांच्या पत्नी सौ. आनंदीबाई कर्वे यांनीं आपल्या आजारीपणांत स्वतःच्या मनाला कांहीं तरी व्यवसाय म्हणून ही आत्मकथा लिहावयास घेतली, कुटुंबियांना करमणुक म्हणून वाचायला दिली. साऱ्यांनाच ती आवडली. त्यांच्या सुनबाईंना वाटलें, आपल्यापुरतीच ही आत्मकथा कशाला ठेवायची! जरा ठाकठीक करून साऱ्या लोकांनाच कां नाहीं वाचायला मिळूं. सुनबाईंची ही कल्पना सर्वांनाच आवडली आणि हें पुस्तक प्रसिद्ध झालें. आनंदीबाईंचें मोठेपण एका मोठ्या पुरुषाची पत्नी म्हणूनच केवळ आहे, असें नाहीं. [illegible] या परीनें त्या मोठ्या [illegible] आयुष्यांतील अनुभवहि मोठे आहेत. 'कोणी [illegible] म्हटलें, तरी आप[illegible] जें वाटतें, पटतें, तें करीत राहायचें. कोणी निं[illegible] न[illegible] दो. ज्याला मिशनरी बाणा म्हणतात तो आनंदीबाईंच्या अंगीं पूर्ण आहे. स[illegible]ानें दूर लोटलेल्या, झिडकारलेल्या, तिरस्कारलेल्या मुलांसाठीं त्यांनीं कितीतरी केलेलें आहे.'' विशेष गाजावाजा होऊं न देतां सतत सेवारत राहाणाऱ्या या महिलेचें हें 'आत्मपुराण' महाराष्ट्रांतील प्रत्येक महिलेनें एक वेळ तरी वाचावें, ऐकावें.

मूल्य सव्वा रुपया

केशव भिकाजी ढवळे, श्रीसमर्थ—सदन, मुंबई ४